नि.दि. दावा क्र. ५१९/२०२५

विजयाबाई व इतर वि. राजेंद्र व इतर

## निशाणी क्र. २२ खालील आदेश.

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला "विना कैफीयतचा" आदेश रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. त्यावर वादीचे म्हणणे मागविले. युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादींच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.२ विरुध्द "विना कैफीयतचा" आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादींना झालेला विलंब जाणुनबुजून व हेतुपुरस्पर नाही. सदर दाव्यात प्रतिवादींचे हक्क व हितसंबंध आहेत. सबब त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयतचा" रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. वादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब आदेशः–

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ यांचे विरुध्द झालेला विनाकैफीयतचा आदेश रक्कम रुपये १००/– प्रत्येकी खर्चावर रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.08.03 16:34:17 +0530

औसा. **(श्री. आवटे पी. पी.)**

दिनांकः– ०३/०८/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, औसा.